प्रकरण क्र. : १५०९/पीडब्ल्यू/२०२५
निशाणी क्र.: ११

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा सरतपास शपथेवर पुन्हा सुरू:**

८. त्यावेळी दुपारचे ३.३० वाजून गेले होते. मला व्हाटसअॅप कॉलवरून सांगितले की तूम्हाला काही काम असेल तर ऑफीसला जा नाही तर घरी गेले तरी चालेल. त्यानंतर मी ऑफीसला गेले. दिनांक १७.१२.२०२४ रोजी मला पुन्हा व्हाटसअॅप कॉल आला. तसेही त्यांना मी माझे व माझे कुटुंबियांचे जिवाला धोका असल्यामूळे मी दर तासाला त्यांना अपडेट्स देत होते. मी भारत बॅक येथील ४० लाखांची एफडी प्रीमॅच्युअर क्लोज केली व माझे सेव्हींग अकाउंटवर घेवून त्यांनी दिलेल्या बॅक अकाउंटवर पैसे ट्रासफर केले व त्याची युटीआर पावती त्यांना पाठवली. त्यानंतर मी साउथ इंडियन बॅक गोरेगाव शाखा येथे गेले. ७० लाखांची एफडी प्रीमॅच्युअर क्लोज केली व माझे सेव्हींग अकाउंटवर घेवून त्यांनी दिलेल्या बॅक अकाउंटवर पैसे ट्रासफर केले व त्याची युटीआर पावती त्यांना पाठवली. त्यानंतर माझे सगळे पैसे संपले होते. त्यांनी मला विचारले अजून काही बाकी आहे का, मी नाही सांगितले. मला ऑफीसवरून फोन आला म्हणून मी लगेच ऑफीसला पोहचले. माझे सोबत असलेले कलीग संजीव अग्रवाल यांना दोन ते तीन दिवसांमधून माझे स्वभावात झालेला बदल जाणवत होता. मी खूप टेंशनमध्ये होते म्हणून माझे सहका—यांना संशय आला. म्हणून मला त्यांनी काय झाले असे विचारले. त्यांनी माझी अवस्था व माझे फोनमधील मेसेजेस व सायबर सेलचे एम्बलेम राजचिन्ह बघून तूझे सोबत फसवणूक झालेली आहे असे मला सांगितले. त्यांनी मला सांगितले आपण पोलीस स्टेशनला जावून सदर फसवणूकीची तक्रार देवू. त्यावेळी आम्ही आमचे ऑफीसच्या बाजूला असलेल्या एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे गेलो. तिथे गेल्यानंतर आम्हाला पोलीसांनी सायबर पोलीस ठाणे येथे तक्रार देण्यास सांगितले. त्यानंतर आम्ही कांदिवली पूर्व येथील सायबर पोलीस ठाणे येथे गेलो परंतू तेथे आमची तक्रार नोंदवली नाही. तेथून आम्हाला बांद्रा सायबर पोलीस ठाणे येथे जाण्यास सांगितले. तेथे मी लेखी तक्रार दिली. आता मला सदरची तक्रार दाखवली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१२** देण्यात आला. त्यानंतर पोलीसांनी माझा जबाब नोंदवून घेतला. सदरचा जबाब व प्रथम खबर अहवाल मला आता दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. प्रथम खबर अहवालास **निशाणी क्र.१३** देण्यात आला. सदर वरील सर्व कागदपत्रे माझे मोबाईल मधून प्रिंटआउट काढून पोलीसांकडे दिली. त्याबाबतचे भारतीय साक्ष अधिनियमचे कलम ६३(४)क अन्वये प्रमाणपत्र दिलेले असून सदरचे प्रमाणपत्र मला

दाखवण्यात आले ते खरे व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१४** देण्यात आला. मी पोलीसांना मला ज्या मोबाईल नंबरवरून लोकल कॉल व व्हाटसअ‍ॅप कॉल आले ते नंबर मी एका कागदावर लिहून पोलीसांना दिले. तो कागद आता मला दाखवला. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर कागदपत्रास आर्टीकल **ए—२१ ते ए—२३** देण्यात आले. आशाप्रकारे आरोपींनी माझी एकूण २ कोटी ४ लाख रूपयांची फसवणूक केलेली आहे.

**उलट तपास आरोपी तर्फे विधिज्ञ श्री. पद्मसिंह पाटील:**

९. न्यायालयाची वेळ संपल्यामूळे उलट तपास पूढील तारखेपर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्विकृती,

Digitally signed by RAJU TUKARAM INGLE
Date: 2026.07.24 14:16:17 +0530

(आर. टी. इंगळे)

दि. २४/०७/२०२६ न्याय दंडाधिकारी (प्रथम वर्ग),

ठिकाण :— मुंबई १२ वे न्यायालय,बांद्रा, मुंबई.